महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य) ,पुणे
दूसरा व तिसरा मजला,नवीन प्रशासकीय इमारत , विधान भवन समोर ,कॅम्प,पुणे १
**दूरध्वनी क्र.** ०२०-२६०५०००६ **Email ID :**dlrmah.mah@nic.in **Web site :** https://mahabhumi.gov.in

क्र.रा.भू./ई-चावडी/ज्यादा वसुली/२०२३ पुणे, दिनांक :- /०३/२०२३

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)

विषय:-ई-चावडी प्रणालीत आगाऊ/जादा वसुली किंवा पुढील वर्षांकरिता वसुली करणे बाबत.

संदर्भ:- इकडील कार्यालयाचे पत्र क्र.रा.का.आ.अ.भू.४/गा.न.नं.१ ते २१ अद्यावतीकरण/२०२२, दिनांक: १२/०८/२०२२

महोदय,

संदर्भीय पत्र क्रमांक अन्वये ई-चावडी पूर्वतयारीच्या सर्वसमावेशक सूचना देऊन संदर्भीय पत्रात नमूद केलेप्रमाणे अष्टसूत्री कामकाज पूर्ण असणाऱ्या गावांसाठी ई-चावडी प्रकल्प कार्यान्वित करणेकरिता आवश्यक अकाउंट व लॉगीन क्रेडेन्शियल उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. राज्यातील ४४,५१२ गावांपैकी २३,९११ इतक्या गावात सध्या ई-चावडीच्या प्रथम भागाचे कामकाज सुरु आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या नियमपूस्तिका खंड चार मधील प्रकरण तीन मध्ये नमूद “वसुलीच्या रक्कमांची नोंद घेणे” या सदरात खालील मागदर्शन नमूद करण्यात आले आहे.

**"जमीन महसूल वसूल केल्यावर लगेच, तलाठ्याने गाव नमुना ९ मध्ये पावती द्यावी व त्यानंतर लगेच त्याने वसुलीची गाव नमुना ८ब मध्ये नोंदी घ्यावी .जादा वसुली व परतावे यामुळे लेख्यामध्ये गोंधळ निर्माण होत असल्यामुळे तलाठ्याने जमीन महसूल वसूल कारताना या गोष्टी टाळाव्या."**

उपरोक्त मार्गदर्शन विचारात घेता व जमीन महसूलाची वसुली प्रक्रिया आता ऑनलाईन उपलब्ध असल्या कारणाने नागरिकांना आगाऊ भरणा करणेची आवश्यकता नाही. याखातर सदर बाब कामकाजातून कमी करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने आगाऊ/जादा जमीन महसुल वसुलीबाबत खालीलप्रमाणे आदेशीत करणेत येत आहे.

१. आगाऊ/जादा वसुली व परतावे ई-चावडी प्रणालीतून चालू वर्षा करीता दर्शविणे शक्य नसल्यामुळे ई-चावडी प्रणाली लागू केलेल्या गावातील तलाठी यांनी आगाऊ/जादा वसुली किंवा पुढील वर्षांकरिता वसुली करणे अपेक्षित नाही.

२. परंतु काही खातेदार यांचे कडून हस्तलिखित पावती मध्ये आगाऊ/जादा वसुली किंवा पुढील वर्षांकरिता वसुली घेण्यात आली असल्यास पुढील वर्षी मागणी निश्चिती करते वेळी मागील आगाऊ/जादा वसुली असलेल्या रक्कमे एवढी सूट ई-चावडी प्रणालीत देण्यात यावी व मागणी सूट बाबत खालील शेरा नमूद करावा. “चलन क्रमांक............ दिनांक:-    /  /२०  नुसार चालू वर्षाची मागणी आगाऊ वसूल करण्यात आल्यामुळे सदर मागणी रक्कमेस सूट देण्यात येत आहे.”

Signed by Niranjan K
Sudhansu
Date: 19-03-2023 15:53:30
Reason: Approved

(नि.कु.सुधांशु)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे

प्रत- जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.
प्रत- श्री.जितेंद्र जोशी, (ई-चावडी) व्यवस्थापक, प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि., पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

२/- मुद्दा क्रमांक २ नुसार जादा वसुली किंवा आगावू वसुली असल्यास, सूट देण्याची तसेच शेरा नमूद करण्याची सुविधा देण्याची कार्यवाही करण्यात यावी.